नि.दि.दा. क्र. ६४/२०१९
करुणा व इतर वि. सखाराम
CNR No.MHWS080007482019

## निशाणी क्र. १४ खाली आदेश
## (पारित दिनांक १८.०२.२०२२)

प्रतिवादी क्र. ०१ ने सदरचा अर्ज त्याचा लेखी जवाब अभिलेखावर घेण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. त्याचे कथनानुसार, सदर प्रकरणात मागील तारखेवर प्रतिवादी क्र. ०१ हे त्याच्या मुलीचे ऑपरेशन असल्याने व मुलांना सुध्दा अकोला येथे राहावे लागल्याने तसेच प्रतिवादीचा नातू सुध्दा आजारी असल्याने त्यांच्या मुलांना दवाखान्यात राहवे लागले. तसेच प्रतिवादी क्र. ०१ अपंग असल्याने त्यांना इतरांचे मदतीशिवाय न्यायालयात हजर राहणे शक्य झाले नाही. त्यामुळे तो लेखी जवाब दाखल करु शकला नाही. तरी प्रतिवादी क्र. ०१ विरुध्द झालेला विना लेखी जवाब आदेश रदद करण्याची विनंती केली.

**०२** याउलट वादीच्या वकीलांनी आज रोजी सदर अर्जास विरोध दर्शविला. त्यांचे कथनानुसार प्रतिवादी क्र. ०१ चा अर्ज अतिशय उशिरा दाखल केला असून वादीवर अन्याय करणारा आहे. सदर दावा मिळकत 'अ' ही वडिलोपार्जित् संपती असून दावा मिळकत 'ब' ही वादी व प्रतिवादी यांची संयुक्त मिळकत आहे. अगोदरच वादी व प्रतिवादी यांचेमध्ये वाटणी झालेली आहे. परंतू प्रतिवादी क्र. ०१ ने वाद मिळकतीवर त्याचा ताबा ठेवलेला आहे. त्यामुळे वादीला सदरचा दावा दाखल करावा लागला आहे. वादी पुणे येथे राहत असून प्रतिवादी वादीचा हक्क नाकारत आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादीमधील नातेसंबंध बघता सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

**०३** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादीने सदरचा अर्ज दि. १६.०७.२०१९ रोजी दाखल केलेला आहे. त्यानंतर तिन्ही प्रतिवादींना नि.क्र. ०९ ते ११ नुसार समन्स तामील झालेले होते. परंतू प्रतिवादी क्र. ०१ न्यायालयात हजर झाला होता. त्याला संधी देवूनही त्याने जबाब दावा दाखल न केल्याने त्याचेविरुध्द दिनांक २८.०१.२०२० रोजी माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी

विना जबाब दावा आदेश पारीत केला होता. तसेच प्रतिवादी क्र. ०२ व ०३ हे हजर न झाल्याने त्यांचेविरुध्द एकतर्फा आदेश पारीत केला होता. त्यानंतर प्रतिवादी क्र. ०१ याने सदरचा अर्ज दि. २४.०२.२०२० रोजी दाखल केलेला आहे. आज रोजी वादीचे वकीलांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. वादीचे वकील नि.क्र. ०५ वर युक्तीवाद करण्यास तयार आहेत.

**<u>०४</u>** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरचा अर्ज दाखल केल्यानंतर कोरोना महामारीमुळे न्यायालयाचे कामकाज अंशतः स्वरुपात सुरु होते. न्यायालयाचे कामकाज दिनांक ०२.०८.२०२१ पासुन पुर्ववतपणे सुरु झालेले आहे. त्यामुळे कोविड–१९ ची परिस्थिती आणि त्याअनुषंगाने वेळावेळी जारी करण्यात आलेले मार्गदर्शक तत्वे तसेच वादीचे वकीलांनी आज दाखल केलेले म्हणणे बघता नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी क्र. ०१ चा अर्ज रु. १००/– खर्चासह मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. ०१ चा लेखी जवाब वादीला खर्च अदा केल्यानंतर अभिलेखावर घेण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by YOGESH DATTATRAY KOINKAR
Date: 2022.02.18 18:30:31 +0530

(यो.द. कोईनकर)

दिनांकः १८.०२.२०२२

दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रिसोड

## <u>CERTIFICATE</u>

I affirm that the contents of this P.D.F. File Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the clerk | : | R.F. Tagad |
| Name of court | : | C.J.J.D.& JMFC;Risod |
| Date | : | 18-02-2021 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer | : | 18-02-2021 |
| Judgment/Order uploaded on | : | 18-02-2021 |